CNR No. MHRG040033982025

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | २५/०९/२०२५ |
| नोंदणी तारीख | : | १५/१०/२०२५ |
| निकाल तारीख | : | ०६/०५/२०२६ |
| कालावधी | : | ०० व. ०७ म. ११ दि. |

**२ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, पनवेल यांचे न्यायालयात, पनवेल,**
**जिल्हा - रायगड**
**(पिठासीन अधिकारी : ए.एस. बडगुजर)**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१४१५/२०२५**
**निशाणी क्र.१५/ब**

**१. सोमीनाथ दत्तू कारभळ**
वय- ३५ वर्षे, व्यवसाय – नोकरी,
रा. मु. बांदखेल, ता. आष्टी, बीड, महाराष्ट्र

**२. लता नामदेव चोथे**
वय- ३६ वर्षे, व्यवसाय – गृहिणी,
रा. प्लॉट नं.१५, स्वप्नपुर्ती निवास,
मखंबलबाद रोड, रामकृष्ण नगर, पिंगले माला,
नाशिक, महाराष्ट्र,

**३. अनिता परभणे**
वय- ३२ वर्षे, व्यवसाय – गृहिणी,
रा. मु. बांदखेल, मु. पो. दौलावडगाव,
ता. आष्टी, बीड, महाराष्ट्र

**४. द्वारकाबाई दत्तू कारभळ**
वय- ६४ वर्षे, व्यवसाय – गृहिणी,
रा. समाज मंदिरासमोर, हरिजन वाडा,
रायगड, महाराष्ट्र **... अर्जदार**

**विरूध्द**

कोणीही नाही **... सामनेवाले**

.....................................................................................
अर्जदारांतर्फे विधिज्ञ – प्रशांत परशुराम वाघमारे.
.....................................................................................

**- न्यायनिर्णय -**
**(घोषित दिनांक ०६/०५/२०२६)**

प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला मिळणेकरीता अर्जदारांनी दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार क्र.१ ते ३ यांचे वडील व अर्जदार क्र.४ यांचे पती दत्तात्रेय उर्फ दत्तू बापू कारभळ उर्फ कारभाळ हे दिनांक २७/०८/२०१८ रोजी मु. बांदखेल, पो. दौलावडगाव, ता. आष्टी, जि. बीड येथे मयत झाले. अर्जदार क्र.१ ते ३ यांची आजी, अर्जदार क्र.४ यांची सासू व मयत दत्तात्रेय उर्फ दत्तू बापू कारभळ उर्फ कारभाळ यांची आई रंगुबाई बापू कारभळ या दिनांक ०१/०३/२००७ रोजी मयत झाल्या आहेत. मयत दत्तात्रेय उर्फ दत्तू बापू कारभळ उर्फ कारभाळ यांच्या पश्चात अर्जदार क्र.१ ते ४ हेच कायदेशीर वारस आहेत. मयत दत्तात्रेय उर्फ दत्तू बापू कारभळ उर्फ कारभाळ यांच्या मालकीची सदनिका क्र. ए-८, तळ मजला, गट नं.८०, हिस्सा नं.२, श्री. ज्ञानेश्वर माऊली को.ऑप.हौसिंग सोसायटी लि., मौजे विचुंबे, ता. पनवेल, जि. रायगड ही मिळकत आहे.

३. अर्जदार क्र.१ सोमीनाथ दत्तू कारभळ यांनी त्यांचे साक्ष शपथपत्र निशाणी क्र.१२ अन्वये दाखल केले आहे. त्यांनी त्यामध्ये अर्जात सांगितलेल्या बाबी नमुद केल्या आहेत. अर्जदार यांनी अभिलेखावर निशाणी क्र.४ अन्वये मयत दत्तू बापू कारभळ यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रत, करारनाम्याची प्रत, अर्जदार क्र.१ ते ४ यांच्या आधारकार्डच्या प्रती, निशाणी क्र.११ वरील यादीसोबत मयत रंगुबाई बापू कारभळ यांच्या मृत्यू

प्रमाणपत्राची प्रत अशी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. अर्जदार यांनी निशाणी क्र.१३ अन्वये पुरावा बंद पुरशीस दाखल केली आहे.

४. प्रस्तुत अर्जाबाबत 'दैनिक किल्ले रायगड' या वर्तमानपत्रात जाहीर नोटीस दिनांक १७/१२/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. न्यायालयीन बेलीफ मार्फत केलेला जाहीरनामा व त्याचा अहवाल, दवंडीपावती निशाणी क्र.८ वर आहे. प्रस्तुत अर्जाला दिलेल्या मुदतीत ते आजतागायत कोणीही हरकत घेतलेली नाही.

५. कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसते की, अर्जदार हे मयत दत्तात्रेय उर्फ दत्तू बापू कारभळ उर्फ कारभाळ यांचे कायदेशीर वारस आहेत.

६. वरील परिस्थिती पाहता असे म्हणावे लागेल की, या प्रकरणामध्ये अर्जदार हे मयत दत्तात्रेय उर्फ दत्तू बापू कारभळ उर्फ कारभाळ यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्जदार हे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. करीता खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**: आदेश :**

१. अर्जदार क्र.१ सोमीनाथ दत्तू कारभळ, अर्जदार क्र.२ लता नामदेव चोथे, अर्जदार क्र.३ अनिता परभणे व अर्जदार क्र.४ द्वारकाबाई दत्तू कारभळ हे मयत दत्तात्रेय उर्फ दत्तू बापू कारभळ उर्फ कारभाळ यांचे कायदेशीर वारस आहेत.

२. अर्जदार क्र.१ सोमीनाथ दत्तू कारभळ, अर्जदार क्र.२ लता नामदेव चोथे, अर्जदार क्र.३ अनिता परभणे व अर्जदार क्र.४

द्वारकाबाई दत्तू कारभळ यांना वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) नियमानुसार स्टॅम्प डयुटी आकारून निर्गमित करण्यात यावे.

ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Digitally signed by ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Date: 2026.05.06 17:45:22 +0530

पनवेल **(ए.एस. बडगुजर)**
दिनांक : ०६/०५/२०२६. २ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
पनवेल.